सदैव तत्पर, सदैव मदतीस

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

Tel :- 022 22620453
E mail ID - depzone1-mum@mahapolice.gov.in

**Dy. Commissioner of Police, Zone 1, Mumbai**
Walchand Hirachand Marg, Fort, Mumbai-400001.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई.
वालचंद हिराचंद मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१

जा.क्र.३१९५/पोउआ/परि१/वा./२०२५ दिनांक -२८/१२/२०२५

प्रति,
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

**विषय -** न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल....

**संदर्भ -** १) शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल१०, दि.२६/०२/२०१९
२) मु.नि.क. बि.सं. क्र. २३१/२५, दि. १७/१०/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून अहवाल सादर करण्यात येतो की, दि. ०१/०७/२०२५ ते दिनांक ३०/०९/२०२५ या कालावधीमध्ये पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ कार्यालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता परिमंडळ -१ मधील सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस निरिक्षक (गुन्हे), पैरवी अधिकारी व विधी अधिकारी, परिमंडळ -१ इत्यादी सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकींमध्ये परिमंडळ-१ मधील दोषमुक्त झालेल्या ०८ खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करण्यात आली.

सदरचा अहवाल माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

(डॉ. प्रविण मुंढे) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, मुंबई

Adr
06/01

Dy. Commissioner of Police (Detection)
Crime Branch C I D Mumbai
जा. क्र. ४५ पोउआ (प्रकटीकरण) /२६
दिनांक ०६/०१/ २०२६

Scanned with CamScanner

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, मुंबई  समितीच्या बैठकीचा दिनांक :- दिनांक - २६/१२/२०२५

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेशन केस क्र. १५३८/२०१९<br><br>कोर्ट नं. ५८<br>मा. न्यायाधीश<br>**श्री उमेश के सार्ते** | **कफ परेड पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १६४/२०१३, कलम ३५३,३३२, ४२७, ५०४ भा.दं.वि | ०९/०२/२०२२ | ०८/०८/२०२५ | १. साक्षीदारांच्या साक्षीमध्ये विसंगती दिसून येत आहे.<br>२. प्रत्यक्षदर्शीच्या साक्षीमध्ये विसंगती दिसून आली.<br>३. जप्त केलेल्या वस्तूंचे मुल्यमापन नोंद केलेली नाही.<br>४. सदर केसमध्ये पंच साक्षीदारांपैकी एकाचा मृत्यु झाला असून दुसरा पंच मिळून येत नाही.<br>५. आरोपीने साक्षीदारांवर हेतूपरस्पर हल्ला केल्याबाबत कोणताही पुरावा रेकॉर्डवर आलेला नाही.<br>६. सदर गुन्ह्यामध्ये आरोप सिध्द होण्याकरीता ठोस, सबळ पुरावे रेकॉर्डवर आलेले नाहीत<br>एकंदरीत पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **नाही** | - | - |
| २ | सेशन केस क्र. ५०५/२०१९<br><br>कोर्ट नं. ५८<br>मा. न्यायाधीश<br>**श्री उमेश के सार्ते** | **कफ परेड पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १३५/२०१७, कलम ३५३,३३२ भादवी सह कलम ८५ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | २२/०४/२०१९ | १२/०९/२०२५ | १. तपासी अधिकारी यांनी स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत.<br>२. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज् घेतलेले नाहीत.<br>३. सरकारी अभियोक्ता यांनी वैद्यकिय अधिकारी यांची तपासणी केलेली नाही.<br>४. तपासी अधिकारी यांनी फिर्यादी सुभाष पांचाल हे घटने दिवशी कर्तव्यावर असल्याबाबत कागदोपत्री पुरावे घेतलेले नाही.<br>५. आरोपी दारूच्या नशेमध्ये होता, रक्ताचे नमुन कोणी जमा केले, कोणी रक्ताचे नमूने सिल केले. याबाबत न्यायालयासमक्ष सरकारी अभियोक्ता यांना शाबित करता आले नाही.<br>६. आरोपीने फिर्यादीस ठोसा मारला. याबाबत साक्षीदार नं. २ व साक्षीदार नं. ३ यांच्या साक्षीमध्ये विरोधाभास / तफावत आहे.<br>७. पंचनामा तयार करताना फिर्यादी हे पोलीस ठाण्यामध्ये होते. त्यामुळे घटनास्थळाचा पंचनाम्यामध्ये साशंकता निर्माण होते.<br>८. सदर केसच्या तपासामध्ये भरपुर त्रुटी आहेत. त्यामुळे फिर्यादीच्या सदर केसची विश्वासर्हता कमी आहे.<br>एकंदरीत तपासी अधकारी यांनी योग्य तपास न केल्याने व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **होय,**<br><br>पोउपनि<br>उमशे शिंदे | **मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर** | - |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुद्ध केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | अ. क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सेशन केस क्र.<br>२८३/२०१९<br><br>कोर्ट नं. ५४<br>मा. न्यायाधीश<br>**श्री.सत्यनारायण नवनदेर** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ८४/२०१८,<br>कलम ३५३, ३३२ भा.दं. वि | १४/०३/२०१९ | १८/०९/२०२५ | १. आरोपी हा Condition beyond his control Aggression, Depression, Emotional irritability Antiety ग्रस्त व इतर आजारांनी ग्रस्त होता.<br>२. आरोपीची शरिरीक परिस्थीती पाहता, तो फिर्यादी डॉक्टरला इच्छेने जाणूनबुजून मारहाण केली असे म्हणता येणार नाही.<br>३. आरोपीची Central Nervous System Lost झाली होती.<br>४. फिर्यादी डॉक्टर यांचे म्हणण्यानुसार आरोपीचा आजार पाहता त्या परिस्थीतीत आरोपी हा त्यांचे मेंदूवरील नियंत्रण गमावले असेल म्हणून मारहाण केली असेल.<br>**एकंदरीत आरोपी हा Condition beyond his control Aggression, Depression, Emotional irritability Antiety ग्रस्त असल्याने न्यायालयाने दोषमुक्त केलेले आहे.** | नाही | **नाही.** | ६ |
| ४ | सेशन केस क्र.<br>284/PW/<br>2019<br>कोर्ट नं. ५८<br>मा. न्यायाधीश<br>**श्री उमेश के सार्ते** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १५८/२०२१,<br>कलम ३५३, ३३२, ३४ भादवि | १५/०३/२०१९ | १२/०८/२०२५ | १. साक्षीदारांच्या साक्षीमध्ये विसंगती / तफावत आहे.<br>२. फिर्यादी स्वप्नील कांबळे हे कर्तव्यावर हजर असल्याचे कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.<br>३. फिर्यादीयांचे साक्षीमध्ये तफावत दिसून येत आहे.<br>४. तपासी अधिकारी यांनी कोणताही ठोस पुरावा न्यायालयामध्ये सादर केलेला नाही.<br>५. फिर्यादी हे लोकसेवक असल्याबाबत बी.एम.सी. कडून तपासी अधिकारी यांनी पुरावा घेतलेला नाही.<br><br>एकंदरीत तपासी अधकारी यांनी योग्य तपास न केल्याने व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **होय,**<br><br>सपोनि अनिल सुर्वे | **मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर** | ७ |
| ५ | सेशन केस क्र.<br>८८३/२०१९<br><br>कोर्ट नं. ४६<br>मा. न्यायाधीश<br>**श्रीमती शयाना पाटील** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र.३८/२०१६,<br>कलम ३९२, ३५३, ३३२ भा.दं.वि. | २०/०६/२०१९ | १२/०८/२०२५ | १. तपासी अधिकारी यांनी स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब नोंदविले नाहीत.<br>२. साक्षीदार यांना मराठी लिहीता वाचता येत नाही. त्यामुळे पंच साक्षीदार यांची विश्वासर्हता कमी होते. त्यांच्या साक्षीला योग्य पुष्टी मिळत नाही.<br>३. सदर खटल्यामध्ये तपासी अधिकारी यांनी इतर महत्वाचे साक्षीदार तपासले नाहीत.<br>४. तक्रारदाराने एकमेव साक्षी दिली गर्दीच्या ठिकाणी आरोपीने मारले इतर कोणीही साक्ष दिली नाही हे न्यायालयास विश्वासर्ह वाटले नाही.<br><br>**तपास अधिकारी यांनी तपास योग्य न केल्यामुळे आरोपीला त्याचा फायदा मिळाल्याने आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **होय,**<br><br>पोउनि सचिन जाधव, | **मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर** | |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरूध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | सेशन केस क्र. ७९३/२०१८<br><br>कोर्ट नं. १०<br>मा. न्यायाधीश<br>**ए.पी. कुलकर्णी** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १९३/२०१८,<br>कलम ३०२, १२०(ब),<br>३४ भा.दं.वि. | २८/१२/२०१८ | १३/०८/२०२५ | १. सदर संपुर्ण घटना परिस्थीतीजन्य पुराव्यावर आधारित आहे.<br>२. सदर घटनेमध्ये प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नाही.<br>३. सवयीचे पंच साक्षीदार आहेत.<br>४. तपासी अधिकारी यांचे उलट तपासणीमध्ये तारखा, वेळ विशिष्ट तारखेला जप्त केलेल्या वस्तु यामध्ये विसंगती आढळते.<br>५. साक्षीदान नं. २ यांची साक्ष सदर केसमध्ये ऐकीव स्वरूपाची आहे.<br>६. पोलीसांना देण्यात आलेली डी.व्ही.डी. यामध्ये विसंगती आहे. फुटेजच्या निश्चिती बद्दल शंका निर्माण होते.<br>७. पिडील बळीचे नातलग साक्षीदार नं. १ व २ यांचा जबाब दिर्घ कालांतराने नोंदविण्यात आला.<br>**तपास अधिकारी यांनी तपास योग्य न केल्यामुळे आरोपीला त्याचा फायदा मिळाल्याने आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **होय,**<br><br>पोनि अविनाश औंधकर, | **मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर** | - |
| ७ | सेशन केस क्र. ४१०/ २०१७<br><br>कोर्ट नं. ५४<br>मा. न्यायाधीश<br>**श्री.सत्यनारायण नवनदेर** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ७९/२०१८,<br>कलम ३०७, ५०४, ३४<br>भा.दं.वि. | ०६/०७/२०१७ | २१/०८/२०२५ | १. सदर केसमध्ये हेतू स्पष्ट होत नाही.<br>२. सदर केसमध्ये बळीतला घटना झाल्यानंतर लगेच डॉक्टराने तपासले असता, कोणतीही जखम आढळून आलेली नाही.<br>३. पुराव्यांवरून असे दिसून येते की, एकाही आरोपीने बळीत इसमास जिवे मारण्याचा प्रयत्न केलेला नाही.<br>४. सदर केसमधील पुराव्यावरून असे दिसून येत आहे की आरोपी आणि बळीत यांच्यामध्ये राजकीय वैमनस्य आहे. त्यामुळे बळीत इसमाचे आरोपाबद्दल शंका उपस्थित होते.<br>५. सदर केसमध्ये तोंडी पुराव्या व्यतिरीक्त इतर कोणताही पुरावा उपलब्ध नाही.<br>**एकंदरीत सबळ पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झालेले आहेत.** | **नाही** | - | - |
| ८ | सेशन केस क्र. 825/ PW/2020<br><br>कोर्ट नं.३३<br>मा. न्यायाधीश<br>**सबिना ए मलिक** | **सर जे जे मार्ग पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १५४/२०२०,<br>कलम ३६३, ३७७ भा.दं. वि. सह ४, ६, ८ ,१२<br>पोक्सो | २९/०९/२०२० | ०२/०८/२०२५ | १. पिडीत मुलाने आरोपीला ओळखले नाही.<br>२. आरोपीला ओळखण्यासाठी आरोपीची ओळखपरेड झालेली नाही.<br>३. पिडीत मुलावर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी लंगडा होता. सदर आरोपीने पिडीत मुलगा जो ९ वर्षाचा होता त्याला उचलून इमारतीत घेवून जावू शकतो का? अभियोक्ता पक्षाने सिध्द करून शकला नाही.<br>४. पिडीत मुलाने सांगितले की त्याच्या मागच्या बाजूला काय घातले ते सांगू शकला नाही.<br>५. रेकॉर्ड वरील पुराव्यावरून हे स्पष्ट होते की, पिडीत मुलगा ज्याने आरोपीने त्याच्यावर लैंगिक अत्याचार केली हा तोच आरोपी आहे ओळखू शकला नाही.<br>एकंदरीत पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **नाही,** | - | - |

Scanned with CamScanner